नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/०१/२०२६ (सोमवार )

## जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक सिल्लारी, पेंच नागपुर येथे पडली पार पोलीस अधिक्षक यांनी पिपरिया, देवलापार येथील MARVEL कृत्रिम बुध्दीमत्ता प्रणाली द्वारे लावलेल्या कॅमेऱ्यांची केली पाहणी नागरिकांना आणि पोलीस पाटलांना सुध्दा प्रात्यक्षीक दाखविण्यात आले

**MARVEL ( Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement )** ने विदर्भातील वनक्षेत्राच्या भागांमध्ये AI सक्षम देखरेख कॅमेरे बसविले असुन आज दिनांक १२/०१/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी पिपरिया, देवलापार येथे लावलेल्या कॅमऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. या प्रकल्पामुळे वनक्षेत्रातील गावांमध्ये वन्यप्राण्यांची हालचाल वेळेत ओळखता येईल आणि तात्काळ इशारे देता येतील. यामुळे माणूस – वन्यप्राणी यांच्यातील संघर्षात लक्षणीय घट झाली आहे. या उपक्रमाचा उद्देश स्थानिक नागरिकांचे संरक्षण आणि वन्यजीव संवर्धन हाच आहे

त्यानंतर जिल्हा व्याघ्र समिती ची बैठक मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांच्या अध्यक्षेखाली **अमलतास कॉम्प्लेक्स, सिल्लारी, पेंच नागपुर** येथे पार पाडली. सदर बैठकीत **MARVEL** ने वनक्षेत्रामध्ये लावलेल्या AI सक्षम देखरेख कॅमेऱ्यांबाबत प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सदर बैठकीत श्रीमती विनीता व्यास उपवनसंरक्षक, पेंच व्याघ्र प्रकल्प ,श्री अक्षय गजभिये, उपसंचालक, पेंच, श्री नितेश देवगडे, विभागिय वन अधिकारी, (दक्षता), श्री सुशील कुमार यादव, रेल्वे संरक्षण दल, नागपुर, श्री गोविंद लुचे बिरासीस, सहा वनसंरक्षक ,श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक विभाग, छभ्ए MSEDCL चे अधिकारी , वनपरिक्षेत्रीय अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, प्रभारी अधिकारी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवणी, देवलापार, बैठकीत हजर होते. सदर बैठकीत मा. श्री हर्ष ए. पोद्दार,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या तसेच अनेक मुददयांवर चर्चा करण्यात आली.

- वन्यजीवांच्या संरक्षणाबाबत महत्त्वाच्या सुचना दिल्या.
- सदर बैठकीत करंट लागुन वाघांचे मृत्यु टाळण्याची फेब्रृवार आणि मार्च २०२६ दोन महीने वन विभाग, MSEDCL, पोलीस विभाग यांनी संयुक्त पेट्रोलिंग करण्यातबाबत सुचना दिल्या.
- NHAI विभागाला वन्यप्राण्यांच्या रस्ते अपघात होवु नये याबाबत महत्त्वाच्या उपयोजना करण्यासाठी सुचना दिल्या.
- मध्यप्रदेश पोलीस आणि महाराष्ट्र पोलीसांनी तोतला डोह परीसरामध्य संयुक्तरित्या पेट्रोलिंग करण्याबाबत सुचना दिल्या.

**आज रोजी देवलापार पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सपोनि श्री नारायण तुरकुंडे यांनी पिपरीया गावतील पोलीस पाटील,सरपंच आणि नागरिकांना सुध्दा AI सक्षम देखरेख कॅमेऱ्यांबाबत प्रात्यक्षिक दाखवुन माहीती दिली.**













## पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद
## ७ नायलॉन मांजा चक्री आणि दुचाकी वाहन ५५ हजार ४०० रूपयांचा मुद्द्देमाल जप्त

**दिनांक ११/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालील प्रमाणे ०२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

**पोस्टे उमरेड :–** उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, बौध्द विहार जवळ गांगापुर उमरेड येथे **आरोपी संकेत सदाशिव सोनटक्के, वय ३० वर्ष, रा.**

**बौध्द विहार जवळ, गांगापुर उमरेड** हा आपले दुकानात नायलॉन मांजाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे उमरेड पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहचुन दुकानाची तसेच आरोपीकडे असलेल्या ॲक्टीव्हा मोटरसायकल क्र. एम एच ४०/सी एन –६३४४ या वाहनाची पंचासमक्ष झडती घेतली असता गाडीच्या डीक्कीतून प्रतिबंधीत नायलॉन मांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) ०३ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती २,२००/–रूपये २) ॲक्टीव्हा मोटरसायकल क्र. एम एच ४०/सी एन –६३४४ किंमती ५०,०००/–रूपये असा एकुण ५२,२००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोस्टे मौदा :– दिनांक ११/०१/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **आरोपी शेख सोहेल शेख रशीद, वय २३ वर्ष, रा. पारडी नागपूर** हा नायलॉन मांजा स्वत: जवळ बाळगुन गुमथळा शिवार येथील बाजारात विक्री करिता येणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पथकाने तात्काळ सापळा रचत कारवाई केली आणि आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपी कडे असलेल्या प्लास्टीक चुंगडीमध्ये नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून मोनोकाईट कंपनीचा एकुण ०४ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ३,२००/– रूपये असा एकुण ३,२००/– रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**दोन्ही कारवाईत ०७ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ५४००/– रूपये २) ॲक्टीव्हा मोटरसायकल किंमती ५०,०००/–रूपये असा एकुण ५५,४००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द कलम १२५, २२३ भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## दारूच्या नशेत निष्काळजीपणाने वाहन चालवुन सदोष मनुष्यवध करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद चालक आरोपी अटक

पोलीस स्टेशन नरखेड :– दिनांक ११/०१/२०२६ रोजी नरखेड पोलीस स्टेशन येथे फिर्यादी हर्षल ज्ञानेश्वर वाढीवे, वय २६ वर्ष, रा. बानोर ता. नरखेड जि. नागपूर यांनी फिर्याद दिली की, फिर्यादीचे वडील ज्ञानेश्वर वाढीवे, वय ६० वर्षे हे दि. ११/०१/२०२६ दुपारी

गावातील ऑटो चालक सचिन श्रावण सातपुते याचे ऑटो क्र एम एच ४० पी २४०२ ने बानोर येथून तपनी येथे कार्यक्रमा करीता वांगेचे बोरे घेऊन गेले होते. काम आटोपुन तपनी येथुन सायंकाळी अंदाजे ०८/०० वा. चे दरम्यान त्याचेच ऑटोने बानोर गावी परत येत असता सावरगाव शिवारात राजनी रोडने त्यांचा ऑटो पलटी होवुन ऑटोचा अपघात झाला त्यामध्ये फिर्यादीचे वडील मरण पावले. **आरोपी ऑटोचालक सचिन श्रावण सातपुते, वय ३२ वर्षे, रा. बानोर याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुध्दा त्याने त्याच्या ताब्यातील ऑटो क्र एम एच ४० पी २४०२ दारूच्या नशेत निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन फिर्यादीच्या वडीलांचा मृत्यु झाला.**

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपी वाहन चालकाविरूद्ध कलम १०५, भान्यासं २०२३ सहकलम १८४, १८५ मोटर वाहन अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी ऑटो चालकास अटक करण्यात आली आहे.**

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मदयपान करून वाहन चालवु नका,स्वतःचा आणि दुसऱ्यांचा जीव धोकयात घालु नका. अन्यथा कठोर कायदेशिर कारवाई ला समोर जावे लागेल.**

## नगपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये २ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन सावनेर** :— सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना **आरोपी कं १) अभिषेक जगदेव वानखेडे, वय २२ वर्ष, रा. वार्ड क्र ०५, सटवा माता मंदीरचे मागे सावनेर, आरोपी क्र. २) नंदू दादाराव ढवळे, वय २५ वर्ष, रा. नक्षत्र कॉलनी सावनेर** हे नेहरू मार्केट तलवार सलुनचे बाजूला सावनेर परिसरात सार्वजनीक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद आरोपीवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने